पुढारी

# पतसंस्थांमधील ठेवींना आता विम्याचे कवच

## दै. 'पुढारी' सहकार महापरिषदेत सहकार आयुक्त दीपक तावरे यांची घोषणा

नाशिक : पुढारी वृत्तसेवा

राज्यातील पतसंस्थांमधील सर्वसामान्यांच्या ठेवींना अधिक सुरक्षितता आणि शाश्वत आधार देण्यासाठी सहकार विभाग सरसावला असून, त्यासाठी त्यांनी आता विमा कंपन्यांशी चर्चा सुरू केली आहे. ज्याप्रमाणे आपण वैयक्तिक आरोग्य विमा काढतो, त्याचधर्तीवर पतसंस्थेतील ठेवीदारांना विम्याचे संरक्षण देण्याचा प्रयत्न असल्याची घोषणा राज्याचे सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी केली. विशेषतः ग्रुप इन्शुरन्सच्या माध्यमातून कमी प्रीमियममध्ये जास्तीत जास्त ठेवीदारांना या सुरक्षा कवचाचा लाभ मिळावा, यासाठी सरकार आणि संबंधित प्रशासन प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.




नाशिक : पुढारी माध्यम समूहातर्फे आयोजित सहकार महापरिषदेचे उद्घाटन करताना सहकार आयुक्त दीपक तावरे.

सहकार क्षेत्रातील प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आणि भविष्यातील आव्हानांवर उपाय शोधण्यासाठी पुढारी माध्यम समूहातर्फे शनिवारी (दि. १८) नाशिकमध्ये आयोजित सहकार महापरिषदेचे उद्घाटन राज्याचे सहकार आयुक्त दीपक तावरे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी नाशिक जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष तथा सहकार बोर्डाचे अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, पुणे पीपल्स को-ऑप. बँकेचे चेअरमन सुभाष मोहिते, कोल्हापूरचे माजी सहनिबंधक डी. ए. चौघुले, ज्ञानदीप को-ऑप. सोसायटीचे अध्यक्ष जिजाबा पवार, रिसील डॉट इनचे संचालक सुधीर पठाडे, नम्रता ॲडव्हर्टायझिंगचे संचालक मच्छिंद्र देशमुख, रेणुकामाता को-ऑप. मल्टिस्टेट सोसायटीचे अध्यक्ष प्रशांत भालेराव, नाशिक विभागाचे सहनिबंधक संभाजी निकम, जिल्हा उपनिबंधक फय्याज मुलाणी, दै. 'पुढारी'चे विभागीय व्यवस्थापक (विशेष उपक्रम) बाळासाहेब नागरगोजे, इव्हेंट मॅनेजर सनी गावडे, दै. 'पुढारी'च्या उत्तर महाराष्ट्र आवृत्तीचे युनिट हेड बाळासाहेब वाजे, उत्तर महाराष्ट्र आवृत्तीचे निवासी संपादक डॉ. राहुल रनाळकर उपस्थित होते. या महापरिषदेत पतसंस्थांसमोरील अडचणी व आव्हाने, पतसंस्थांची वसुली धोरण, सहकारी संस्थांचे डिजिटायझेशन आदी विषयांवर मंथन झाले. यावेळी जिल्ह्यातील नामवंत ४५ पतसंस्थांचे पदाधिकारी, प्रतिनिधी यांचा सन्मान करण्यात आला.

### आयुक्त दीपक तावरे यांचा थेट संवाद

महापरिषदेत सहभागी झालेल्या पतसंस्था पदाधिकारी व प्रतिनिधींनी आयुक्त दीपक तावरे यांच्याशी थेट संवाद साधला. पतसंस्थांना येणाऱ्या अडचणी, सुरू असलेल्या उपाययोजना, अडकलेल्या ठेवींबाबत प्रतिनिधींनी आयुक्त तावरे यांच्याकडे प्रश्नांद्वारे लक्ष वेधले. त्यावर आयुक्त तावरे यांनी मुक्त व परखडपणे समर्पक उत्तरे देत, प्रतिनिधींच्या शंकाचे समाधान केले. याशिवाय महापरिषदेनंतरही प्रतिनिधींनी आयुक्त तावरेंना पत्र देत समस्या मांडल्या.


Powered by: erelego.com